30-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/29/2025 9:34 PM Page 1



रावणफोंड आरओबी : कंत्राटदार व सल्लागारांविरोधात तक्रार दाखल पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



प्ले-ऑफसाठी गुजरात टायटन्स सज्ज पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ३० मे २०२५ । पाने ४ । ₹ ४

। REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 । Volume 13, Issue 267 । Verna, । facebook.com/dainikherald । Friday 30 May 2025 । Pages 4 । ₹ 4

# गावडे आऊट , तवडकर इन ?

## मंत्री गोविंद गावडे यांना मंत्रीमंडळातून वगळण्यात आल्याची चर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २९ : खुद्द मुख्यमंत्री सांभाळत असलेल्या आदिवासी कल्याण खात्याच्या कारभारावर जाहीर टीका करून वादग्रस्त ठरलेले सरकारमधलेच मंत्री गोविंद गावडे यांना मंत्रीमंडळातून डच्चू मिळाल्याची चर्चा आहे . गुरुवारी रात्री उशीरापर्यंत भाजप अंतर्गत अनेक घडामोडी वेगाने घडत होत्या . गावडे यांनी मुख्यमंत्र्यांना भेटून आपली बाजू स्पष्ट केल्यानंतर गुरुवारी त्यांनी प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांची भेट घेऊन आपल्या 'त्या ' वक्तव्याबद्धल आपली बाजू मांडली ; मात्र गावडे यांनी आपले मंत्रीपद सोडावे असे आदेश पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांकडून आलेले असल्याची माहिती आहे. गावडे यांच्या जागी एसटी समाजाचेच नेते असलेले सभापती रमेश तवडकर यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाल्याचीही चर्चा आहे .**

२५ मे रोजी झालेल्या प्रेरणा दिन कार्यक्रमातील आपली विधाने तोडून मोडून वापरुन आपल्या विधानांचा मिडीयाकडून विपर्यास करण्यात आला अशी आपली बाजू जरी मंत्री गोविंद गावडे यांनी बुधवारी मुख्यमंत्र्याना भेटून मांडली असली तरी त्यांच्यावरील कारवाई टळली नसल्याची माहिती आहे . गावडे यांच्यावर कारवाई करायची की नाही याचा निर्णय त्यांच्याशी बोलणे झाल्यानंतरच घेऊ असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी काही पत्रकारांना सांगितले होते. त्यानुसार दामू नाईक यांची भेट घेऊन गावडे यांनी गुरुवारी आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला अशी सुत्रांची महिते आहे.

दरम्यान गावडे जी भूमिका घेतील त्या भूमिकेला आपले समर्थनच असेल असे एसटी समाजच्या अनेक नेत्यांनी जाहीर केले आहे. तर दुसऱ्या बाजूला अनेक महीने प्रलंबीत असलेला मंत्रीमंडळ बदलाचा प्रश्न या निमित्ताने निकाली निघेल अशी शक्यता आहे . त्यामुळे केवळ गावडेंकडेच असलेल्या मंत्रीपदासाठीच नाही तर इतर एखाद्या खात्यासाठी तरी मंत्री म्हणून आपली वर्णी लागेल य आशेने सरकरमधल्या रिकामी मंत्र्यांचे प्रयत्न सुरू झाले आहेत. जर गावडे यांच्याकडचे मंत्रीपद काढून घेतले तर एसटी समाज नाराज होवू नये यासाठी त्याच समाजाच्या रमेश तवडकर यांचे नाव आघाडीवर असल्याची सुत्रांची माहिती आहे. माध्यमांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री सावंत आणि मंत्री गावडे यांना या बदलाबद्धल विचारले असता या दोघांनीही यावर कोणतीही प्रतिक्रीया देण्यास नकार दिला

## निवडक

### मेरियॉट हॉटेलमधील कॅसिनोत खून

**पणजी, दि. २९:** कांपाल मिरामार येथील मेरियॉट हॉटेलमधील कॅसिनो कार्निव्हलमध्ये गुरुवारी पहाटे एका मद्यधुंद अवस्थेत असलेल्या हैदराबादच्या कॅसिनो ग्राहकाने हिंसक हल्ला केला. या हल्ल्यात सुरक्षारक्षक धीरू शर्मा (वय ३३, सांता, मध्यप्रदेश) याचा मृत्यू झाला . आरोपीने लोखंडी क्लॅम्प असलेल्या लाकडी पट्टीने धीरू शर्मा याच्या डोक्यावर प्राणघातक वार केला. या प्रसंगी इतर सुरक्षारक्षकांवर देखील हल्ला झाला, ज्यात एक बाऊन्सर सत्यम सुभाष गावकर (वय २७, शिरोडा) हा गंभीर जखमी झाला.

सुरक्षारक्षकांवर झालेल्या हल्ल्यानंतर आरोपी अब्दुल अल्ताफ (वय ३५, चारमिनार, हैदराबाद) दाबोळी विमानतळाकडे पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना मेरियॉट हॉटेलमधील इतर सुरक्षारक्षकांनी त्याला पकडले. ही घटना गुरुवारी पहाटे सुमारे ३:१० वाजता घडली. पोलिसांनी तात्काळ खुनाचा गुन्हा नोंदविला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. उत्तर गोवा पोलीस अधीक्षक राहुल गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने जवळच्या जिन्यावरून लाकडी रॉड आणि लोखंडी क्लॅम्प घेऊन वादातून सुरक्षारक्षकांवर हल्ला केला. एसपी गुप्ता म्हणाले की , धीरू शर्मा याला गंभीर जखमांमुळे गोवा मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी हलवले असता त्याचा दुःखद मृत्यू झाला. तर, सत्यम गावकर याला डोक्याला गंभीर जखम झाली आहे. आरोपी अब्दुल अल्ताफ हा हैदराबादच्या मैलारदेवपल्ली पोलीस ठाण्यात नोंदणीकृत हिस्ट्रीशीटर असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. त्याला दाबोळी विमानतळावरून पळून जाण्याच्या प्रयत्नात ताब्यात घेण्यात आले.

# टॅक्सी धोरणाविरोधात टॅक्सी चालकांचे जोरदार आंदोलन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हणजूण, दि. २९ :** राज्य सरकारने अलीकडेच कॅब ग्रिगेटर्ससाठी नवीन नियमावली लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर कळंगुट आणि परिसरातील स्थानिक टुरिस्ट टॅक्सी चालक व मालकांनी या निर्णयाविरुद्ध जोरदार नाराजी व्यक्त केली आहे. या नियमावलीमुळे हजारो स्थानिक टॅक्सीचालकांना खासगी कंपन्यांच्या नियंत्रणाखाली आणण्याचा धोका असल्याचे ते म्हणत आहेत.

गुरुवारी सकाळी हणजूण पोलिस स्थानकाजवळ टॅक्सी चालकांनी सरकारच्या नव्या टॅक्सी धोरणाविरोधात मोठी सभा आयोजित केली. त्यांनी थेट पोलिस स्थानकात जाऊन आपला निषेध नोंदवण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांना स्थानकाच्या मुख्य दरवाजावरच रोखले. त्यामुळे



वातावरण तणावपूर्ण झाले.

टॅक्सी चालक संघटनेचे अध्यक्ष योगेश गोवेकर यांनी या सरकारच्या धोरणाविरोधात कडक प्रतिक्रिया दिल्या. त्यांनी सांगितले की, सरकार स्थानिक टॅक्सीचालकांना खासगी कंपन्यांच्या गुलामगिरीत फसवण्याचा प्रयत्न करत आहे. आम्ही हा डाव पूर्ण ताकदीने उधळून लावणार आहोत.

तसेच योगेश गोवेकर यांना अटक होणार असल्याच्या अफवांमुळे टॅक्सी चालकांमध्ये अधिकच असमाधानाचे वातावरण निर्माण झाले. या वेळी शिवोली काँग्रेस गट समितीच्या अध्यक्ष पार्वती नागवेकर, कपिल कोरगावकर यांसह अनेक पदाधिकारी टॅक्सी चालकांसोबत हणजूण पोलिस स्थानकात उपस्थित होते.

हणजूण पोलिस स्थानकात मोठ्या संख्येने जमा झालेले टॅक्सी चालक पोलिसांनी मुख्य दरवाज्याजवळच रोखले. पोलिस निरीक्षक सूरज गावस यांनी घटनास्थळी येऊन आंदोलनकाऱ्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आंदोलनातील पाच प्रमुख नेत्यांना स्थानकात बोलावून शांतता राखण्याचे आवाहन केले. तरीही परिसरात टॅक्सी चालकांचा मोठा जमाव पाहायला मिळाला.

या आंदोलनामुळे स्थानिक प्रशासन आणि सरकारवर दबाव वाढल्याचे जाणवते, तर टॅक्सी चालकांची मागणी आहे की सरकारने कॅब ग्रिगेटर्स नियमावली रद्द करून स्थानिकांची हितसंबंध सुरक्षित करावेत.

# पर्यटकांचा वनरक्षकांवर चाकूहल्ला

▶ दोघांना अटक, परिसरात तणाव

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २९:** दूधसागर धबधबा पाहण्यासाठी कुळे जंगलात बेकायदेशीररित्या प्रवेश केलेल्या चार पर्यटकांनी दोन वनरक्षकांवर चाकूने हल्ला केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. हल्ल्यानंतर सर्व आरोपी जंगलात पळून गेले, मात्र तात्काळ सुरू झालेल्या शोध मोहिमेत त्यांना अटक करण्यात आली. या हल्ल्यामुळे कुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही घटना गुरुवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. नागू दहिफोडे आणि मंगलदास गावकर या कर्तव्यावर असलेल्या दोन



वनरक्षकांनी जंगलात फिरत असलेल्या पर्यटकांना थांबवून विचारणा केली. परंतु, त्यावेळी चारपैकी दोघांनी अचानक चाकू काढून रक्षकांवर हल्ला केला. या झटापटीत दोन्ही वनरक्षक गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला, मानेला आणि शरीराच्या इतर भागांना दुखापत झाली आहे.

जखमी वनरक्षक हे कुळेचे रहिवासी असल्यामुळे गावात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. स्थानिक नागरिकांनी हल्ल्याचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने उसगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.

पान २ ▶

